ठाणे महानगरपालिका,ठाणे.
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २९/१०/२००९

मा.स्थायी समिती सभा
सभा सुचना क्र.१३ दिनांक २६/१०/२००९
सभा क्रमांक१ दिनांक २९/१०/२००९

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २९/१०/२००९ रोजी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.१३ दिनांक २६/१०/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रगुप्त सिताराम घाग | सभापती |
| २. | श्री. भैय्यासाहेब (नागसेन)गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.पांडुरंग गोविंद पाटील | सदस्य |
| ४. | श्री.राजन नारायण किणे | सदस्य |
| ५. | श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे | सदस्य |
| ६. | श्री.सुधीर विष्णु कोकाटे | सदस्य |
| ७. | सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |
| ८. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ९. | श्रीमती सुरेखा सुरेख खातु | सदस्या |
| १०. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ११. | सौ.कविता सुरेश पाटील | सदस्या |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| २. | श्री.सुभाष आत्माराम खारकर | सदस्य |
| ३. | श्री.नजिब सुलेमान मुल्ला | सदस्य |
| ४. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |
| ५. | श्री.यासिन अयुब कुरेशी | सदस्य |

वंदेमातरमने सभेची सुरुवात होते.

मा.महापालिका सचिव अजेंडा वाचून दाखवितात.

श्री. हणमंत जगदाळे :

सभापती महोदय, ठाणे शहरामध्ये दिवाळीच्या सणाच्या कालावधीमध्ये १८ ऑक्टोंबर रोजी एक मोठया प्रमाणातील दुर्घटना घडुन महापालिकेतील आपले सहकारी तानाजी काळे, संतोष शिंदे , जी.एस.सिंग, अवधूत ठाणेकर ,किशोर पाटील, एस.आर.जमादार असे सहा फायरमन ज्याठिकाणी जी घटना घडली त्या घटनेवर काम करण्यासाठी गेले असताना हे आपले सहाही फायरमन मृत्युमुखी पडले आहेत. वास्तविक पाहता अशाप्रकारची शहरामध्ये घटना घडल्यानंतर विविध प्रकारच्या बातम्या आपल्या वर्तमानपत्राच्या तसेच प्रसिध्दीच्या माध्यमातुन आपल्याला ऐकायला मिळाल्या आहेत. अग्निशमन विभागाच्या संदर्भात आपण मा.स्थायी समितीमध्ये तसेच मा. महासभेमध्ये वारंवार चर्चा केलेली आहे. ठाणे शहराचा विकास झपाटयाने होत आहे आणि हा विकास झपाटयाने होत असताना त्यामधील प्राथमिक सुविधांकडे देखिल तेवढयाच तीव्रतेने बघणे गरजेचे असते. झालेल्या दुर्घटनेसंदर्भात सभागृहाच्या वतीने मी निश्चितपणे आदरांजली वाहीन. या दुर्घटनेमध्ये आपले सहा सहकारी गेले आहेत याचे निश्चित कारण असावे, असे मला वाटते. तरी मा. सभापती महोदयांना मी विनंती करेन की, यासंदर्भात संबंधित खाते प्रमुखांनी खुलासा करावा. यासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा व्हावी असे माझे स्पष्ट मत आहे. याबाबत चर्चा होऊन या सहा कर्मचा-यांना आदरांजली म्हणून ही सभा संपूर्णपणे तहकुब करावी अशी मी विनंती करीत आहे.

श्री. दिलीप चंद्रकांत बारटक्के :

सभापती महोदय, ठाणे शहरामध्ये १८ ऑक्टोंबर रोजी एक मोठया प्रमाणातील दुर्घटना घडुन महापालिकेतील आपले सहकारी, ज्याठिकाणी ही घटना घडली त्या घटनेवर काम करण्यासाठी गेले असताना हे आपले सहाही फायरमन मृत्युमुखी पडले आहेत त्यांना मी आमच्या पक्षाच्या वतीने आदरांजली वाहत आहोत. त्यांना श्रध्दांजली वाहत असताना आपल्या ठाणे शहराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अग्निशमन केंद्रे व त्यांना देण्यांत येणारी साधनसामुग्री पुरेशी आहे कां , हाही हयाठिकाणी विषय आलेला आहे. आणि त्याबाबत चर्चा होऊन आवश्यक असणारी साधनसामुग्री तसेच आवश्यक तो कर्मचारी वर्ग त्यांना मिळाला पाहीजे हीच ख-या अर्थाने त्यांना श्रध्दांजली होईल, असे मला वाटते. ठाणे शहरामध्ये मोठ-मोठी नागरी संकुले वाढत आहेत आणि त्याप्रमाणात अग्निशमन दल कमी पडत आहे . तरी अग्निशमन विभाग परीपूर्ण व्हावी अशी याठिकाणी मी विनंती करतो.

तसेच ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये कोपरीजवळ रेल्वे लाईनवर शुक्रवार दि.२३.१०.२००९ रोजी स. ११ वाजण्याच्या सुमारास ठाणे पूर्व-पश्चिमला जोडणा-या नविन पुलाचा गर्डन बाजूलाच असलेल्या पाण्याच्या पाईपालाईन सहीत खालुन जात असलेल्या रेल्वेवर पडून मोठा अपघात झाला. सदर अपघातामध्ये रेल्वेचे मोटरमन तसेच अन्य दोन प्रवासी यांचे निधन झाले आहे. त्यांनाही आपण श्रध्दांजली वाहत आहोत. तसेच या दुर्घटनेबाबत पुढील सभेत सखोल चर्चा होणे गरजेचे आहे.

श्री. पांडुरंग पाटील :

मा.सभापती महोदय, दि. १८ ऑक्टोंबर २००९ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या परीक्षेत्राामध्ये कधी न घडलेली दुर्दैवी घटना घडली. आणि ऐन दिवाळीच्या सणामध्ये आपले सहा जवान मृत्युमुखी पडले व या शहरावर दुःखाचे सावट कोसळले. घडू नये ते घडून गेलेले आहे. त्यादिवशी गडकरी रंगायतन येथे ‘ दिवाळी पहाट ’ हा कार्यक्रम असताना स. ६.२५ वा. मला राजधरकर यांचेकडून समजले स. ६.३० वा. मी तारांगण येथे पोहोचलो होतो, तेंव्हा या जवानांचे शव देखिल लिफटमधून काढले नव्हते.

ती सर्व परीस्थिती मी जवळून पाहीली आहे. जवानांचा आकांत , तारांगण मधील सर्व सदनिकांवर पडलेली शोककळा , तेथील सन्नाटा मी हे पाहीलेले आहे. हे कां घडले आणि कसे घडले याबाबत निरनिराळया संस्थांचा अहवाल प्राप्त होईल. सार्व. बांधकाम विभागाचा लिफटचा अहवाल आहे, शासनाचा इलेक्ट्रिक वायरमनचा अहवाल आहे, पोलिसांचा अहवाल आहे तसेच त्या मजल्यावर त्या बिल्डरने कांही फेरफार केला आहे कां याबाबत शहर विकास विभागाचा अहवाल आहे. हे अहवाल प्राप्त झाल्यानंतर निष्कर्ष काढणे सोईच होईल. परंतु सहा जवान मृत्युमुखी पडले आहेत ही वस्तुस्थिती आहे, जी नाकारता येणार नाही. एकदम कमी वयामध्ये हे कर्मचारी मृत्युमुखी पडले आहेत. या शहरामध्ये अग्निशमन केंद्रे वाढवित असताना प्रशासनाच्या कांही चुका आहेत, कांही त्रुटी आहेत याचाही श्रध्दांजलीच्या निमित्ताने उपाय होणे आवश्यक आहे. आजमितीस ५ अग्निशमन केंद्रे आपल्याकडे आहेत. शासनाच्या नॉर्म्स प्रमाणे १ लाख लोकवस्तीला १ अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. नव्याने ५ अग्निशमन केंद्रे आरक्षित आहेत आणि ब-याचशा जागा आपल्या ताब्यात आलेल्या आहेत. जी ५ अग्निशमन केंद्रे आहेत तेथेही कर्मचारी वर्ग अपुरा आहे. उप स्थानक अधिकारी, स्थानक अधिकारी स्वतः गाडी चालवुन घेऊन जातो व आग विझविण्यासाठी स्वतः सहाय्य करतो. कारण कर्मचारी कमी आहेत. चालकांची ४० पदे असताना २७ पदे भरली आहेत, त्यामध्ये ३ अनफिट आहेत १३ पदे रिक्त आहेत. स्थानक अधिकारी ११ पदे मंजूर आहेत, ६ भरलेली आहेत, ५ रिक्त आहेत. उप स्थानक अधिकारी २० पदे मंजूर आहेत ८ पदे रिक्त आहे, १२ भरलेली आहेत. ही घटना घडली म्हणून त्याचा ऊहापोह आपण या सभागृहात करीत आहोत. परंतु कार्मिक अधिकारी, उपआयुक्त स्तरावर वारंवार या कर्मच-यांची मागणी करीत असताना सुध्दा त्याला पुरेसा कर्मचारी वर्ग दिला जात नाही. वास्तविक ही पदे भरणे आवश्यक आहे. जी ५ स्थानके आहेत त्यामध्ये या कर्मचा-यांची कांही ठिकाणी राहण्याची व्यवस्था आहे कांही ठिकाणी व्यवस्था नाही. परंतु कॉल आल्यानंतर ते जीवाची बाजी लाऊन आग विझविण्याचा प्रयत्न करतात. ही दुर्घटना घडल्यानंतर कांही वृत्तपत्रामध्ये तसेच कांही प्रतिष्ठीत नागरिकांनी सुध्दा जवानांकडे बोट दाखविण्याचा प्रयत्न केला की ,जेंव्हा आग लागते तेंव्हा कोणत्याही फायरमनने लिफटचा वापर करु नये.

ज्यावेळेला रात्री१.०० वा. आग लागली ती बेरुममध्ये लागली होती. त्या फलॅटची रचना अशी आहे बेडरुमनंतर किचन नंतर हॉल आहे नंतर कॉरीडॉर आहे व त्याच्या दुस-या टोकाला लिफट आहे. रात्री १.३० वा. आग विझविली गेली, त्या मजल्यावरच्या चारही फलॅटच्या मालकांना बोलावुन घेतले. त्या फलॅटचा रविंद्र कुळकर्णी मालक आहे त्याने शहानिशा केली आणि भट साहेबांना फोन केला की, आग विझविली गेली आहे. तरी फायरमनने काळजी घेतली, आग लागली आहे त्यामुळे वास येईल, तुम्हाला त्रास होईल, खिडक्या उघडया ठेवा आणि तुम्ही नातेवाईकांकडे झोपायला जा. परत आग पहाटे ४.०० वा. लागली. ज्यांनी ही आग विझविली होती तेच जवान प्रथम त्या मोहीमेवर गेले होते. त्यांना माहीत होते आग कोठे लागली आहे. परंतु कॉरीडॉरपर्यंत किंवा लिफटपर्यंत आग आली असेल याची त्यांना सुतराम कल्पना नव्हती. अपघात घडून गेला आहे परंतु एक बाब प्रकर्षाने पुढे आलेली आहे की, लिफटचा विजेचा प्रवाह कोणीतरी बंद केला होता. त्याची चौकशी पोलिसांमार्फत सुरु आहे. तसाच लिफटचा अहवालही प्राप्त झाला आहे असे माझ्या कानावर आले आहे. कांही जरी त्रुटी असल्यातरी आज ठाणे शहरामध्ये ज्या मोठ-मोठया सदनिका आहेत , टॉवर्स आहेत या फायरमनसाठी स्वतंत्र लिफट असावी अशी नियमावली असते. ज्यावेळी आपण टॉवर्सला ओ.सी. देतो त्यावेळी त्याठिकाणी फायरमनसाठी लिफट आहे किंवा नाही याची खातरजमा होणे आवश्यक आहे , तसेच सहा महीन्यांनी किंवा वर्षानी फायर लिफट चालू स्थितीत आहे की बंद आहे याची पडताळणी किंवा पाहणी होणे गरजेचे आहे. आतापर्यंत घडले आहे की नाही हे मला माहीत नाही. त्या लिफटचे परीक्षण कोणी करायचे ? महापालिकेने की पी.डब्ल्यु.डी. ने करायचे याची कुठेतरी चर्चा या शहरामध्ये होणे आवश्यक आहे. भविष्यात अशी दुर्घटना पुन्हा या

शहरामध्ये घडू नये नाहक तेथील नागरीक किंवा कर्मचारी मृत्युमुखीला सामोरे जाऊ नये त्यासाठी तुम्ही-आम्ही सर्वांनी काळजी घेणे गरजेचे आहे. नव्याने जे पांच स्टेशन आपण मंजूर करणार आहोत. आता जे पांच फायरस्टेशन अस्तित्वात आहेत त्यांनाच कर्मचारी वर्ग अपुरा आहे. मध्यंतरीच्या काळात २२ फायरमन पदे भरण्यासाठी जाहीरात दिली परंतु गोषवारा मात्र ४५ फायरमनचा निघाला आणि ती फाईल मी वाचली . ३५ वय उलटुन गेलेले जे फायरमन आहेत त्यांना निवड समितीने जे मार्क्स दिलेले आहेत ते मार्क्स जे फायरमन सिलेक्ट केले आहेत त्यांच्यापेक्षा ५० टक्केने कमी आहेत मग अशा फायरमनची प्रशासनामार्फत शिफारस होण्याची आवश्यकता आहे कां ? अशाप्रकारे आपण कोणाला कव्हर करतो याचे भान प्रशासनाने ठेवणे आवश्यक आहे. माझी प्रशासनाला विनंती आहे की, ज्यावेळेला फायरमनवरती आपण संपूर्ण शहराची संपूर्ण भिस्त ठेवतो. नुसती आग लागलीतर आपण फायरमनना बोलवत नसुन, जर कुठे पक्षी अडकला असेल किंवा कुठे साप आला असेलतर इ. अनेक कारणांसाठी फायरमनना बोलवतो. फायरमन हा जनतेचा सखा आहे , त्याचा दर्जा त्याप्रमाणेच राखणे ही सर्वांची गरज आहे. हे करीत असताना, पांच फायर स्टेशन अस्तित्वात आहेत तेथे जी पदे रिक्त आहेत.ही रिक्त पदे त्वरीत भरण्यांत यावीत आणि भविष्यामध्ये जे पांच फायरस्टेशन बनणार आहेत तेथेही पदे भरण्याबाबत येत्या मा. महासभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यांत यावा, निश्चित मा. महासभा त्याला मंजूरी देईल. आणि भविष्यात शासनाच्या नॉर्म्स प्रमाणे १ लाख लोकवस्तीला एक फायरस्टेशन ही जर तेथील लोकप्रतिनधीची मागणी असेलतर त्या मागणीला आपणाला सामोरे जाता येईल. जे सहा फायरमन मृत्युमुखी पडले आहेत त्यांना मी माझ्या पक्षातर्फे आणि या सभागृहातील सर्व सदस्यांतर्फे श्रध्दांजली वाहत असतानाच भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून तुम्ही आम्ही सर्वांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

हे करीत असतानाच या देशाला ज्यांनी हरीतक्रांती घडवुन दिली ते डॉ. नॉर्मन बोरवॅक यांचेही दुःखद निधन झाले आहे. आज आपल्या देशामध्ये जे निरनिराळया भातशेतीचे उत्पादन काढतो आणि आपला देश भातशेतीमध्ये स्वयंपूर्ण झाला याचे संपूर्ण श्रेय त्यांना आहे. त्यांना नोबेल पारीतोषिक मिळालेले आहे. आणि ७० च्या दशकामध्ये ते भारतभेटीवर आले होते.डॉ.नॉर्मन बोरवॅक यांच्यामुळेच आपला देश , आपला महाराष्ट्र शेतीप्रधान झालेला आहे. याचे संपूर्ण श्रेय आपल्या देशानेच नव्हेतर जगाने त्यांनाच दिलेले आहे. त्यांनाही सर्वांच्या वतीने श्रध्दांजली वाहणे आवश्यक आहे.

तसेच ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये कोपरीजवळ रेल्वे लाईनवर शुक्रवार दि. २३.१०.२००९ रोजी स. ११ वाजण्याच्या सुमारास ठाणे पूर्व-पश्चिमला जोडणा-या नविन पुलाचा गर्डन बाजूलाच असलेल्या पाण्याच्या पाईपालाईन सहीत खालुन जात असलेल्या रेल्वेवर पडून मोठा अपघात झाला. ही एक विदारक घटना आहे. जरी रेल्वे जबाबदार असलीतरी ते ठाणे महापालिकेच्या हद्दीमध्ये घडले आहे. आज आपल्या अधिका-यांनी चौकशीसमोर संपूर्ण बाबी मांडलेल्या आहेत. परंतु मधल्या चार-पाच दिवसामध्ये वृत्तपत्रातुन, वृत्तवाहिन्यांनी तसेच विशेष करुन रेल्वेकडून महापालिकेलाच दोष देण्याचा जो प्रकार चालू आहे तो निश्चितच योग्य नव्हे. वस्तुस्थिती जनतेसमोर निश्चित आलेली आहे. सदर अपघातामध्ये रेल्वेचे मोटरमन तसेच अन्य दोन प्रवासी यांचे निधन झाले आहे. त्यांनाही आपण श्रध्दांजली वाहत आहोत.

आंत्ताच पांच मिनिटापूर्वी मला एक निरोप आला, ज्याने या शहरामध्ये ॲथलेटीक संघटना राबविली ते प्रल्हाद भांगले हे आपल्या महापालिकेतील कर्मचारी आहेत त्यांचे आजच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे.जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर त्यांनी उच्चस्तरीय ॲथलेटिकपटू म्हणून नांव मिळविले आहे. तसेच ते ॲथलेटिक्सचे प्रशिक्षक म्हणुनही काम पाहत होते. तसेच ते ठाणे महानगरपालिकेतील अतिशय गुंणवान व कामामध्ये प्रामाणिक असा कर्मचारी होता. महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेमध्ये श्री. प्रल्हाद भांगले यांचा सिंहाचा वाटा होता. कै. प्रल्हाद भांगले यांना आपण श्रध्दांजली वाहून त्यांचे मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुया.

तसेच नाटयकर्मी चित्तरंजन कोल्हटकर यांनीही नाटयक्षेत्राामध्ये भरीव योगदान दिले आहे. त्यांचेही दुःखद निधन झाले आहे. त्यांनाही आपण श्रध्दांजली वाहूया.

(सभागृहातील उपस्थित सन्मा. सभापती, सर्व सदस्य, अधिकारी, कर्मचारी यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली अर्पण करुन, मृतात्म्यास चिरशांती व सदगती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली.)

<u>दुखवटा ठराव</u>

<u>मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०११ दिनांक २९/१०/२००९</u>

**<u>ठ रा व :-</u>**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील तारांगण संकुलामधील पुर्नवसू इमारतीच्या १४ व्या मजल्यावर रविवार १८ ऑक्टोंबर २००९ रोजी पहाटे लागलेली आग विझविण्यासाठी गेलेले सहा फायरमन उद्वाहनच्या बाबतीत झालेल्या दुदैवी अपघातात मृत्युमुखी पडले.

अतिशय कर्तव्यदक्ष असे श्री.अवधूत ठाणेकर, श्री.जी.एस.सिंग, श्री.तानाजी काळे, श्री.किशोर पाटील, श्री.संतोष शिंदे व श्री. एस.आर.जमादार हया सहा फायरमनचे अपघाती निधन झाले. महानगरपालिकेच्यावतीने नागरी सुविधा देणेसाठी कर्तव्यावर असताना हया जवानांचे बलिदान गेले आहे. हया सहाही जवानांच्या कुटुंबावर फार मोठा आघात झाला आहे.

कै..अवधूत ठाणेकर, कै..जी.एस.सिंग, कै.तानाजी काळे, कै.किशोर पाटील, कै.संतोष शिंदे व कै. एस.आर.जमादार हया सहाही फायरमनना ही स्थायी समिती श्रध्दांजली अर्पण करीत असून त्यांचे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखामध्ये सहभागी होत आहे. हया मृतात्म्यास चिरंशाती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे..

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**<u>दुखवटा ठराव</u>**

<u>मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१२ दिनांक २९/१०/२००९</u>

**<u>ठ रा व :-</u>**

ठाणे महानगरपालिका हद्दीमधील कोपरीजवळ रेल्वे लाईनवर शुक्रवार दिनांक २३/१०/२००९ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ठाणे पूर्व-पश्चिमेला जोडणा-या नविन पुलाचा गर्डर त्याबाजूलाच असलेल्या पाण्याची पाईप लाईन खालुन जात असलेल्या रेल्वेवर पडून मोठा अपघात झाला. सदर अपघातामध्ये रेल्वेचे मोटरमन श्री. रामचंद्रन तसेच अन्य दोन प्रवासी यांचे या अपघातामध्ये निधन झाले आहे.

मोटरमन कै.रामचंद्रन यांचे निधनाने त्यांचे कुटंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कै.रामचंद्रन व अन्य दोन प्रवासी यांचे मृतात्म्यास ही स्थायी समिती श्रध्दांजली अर्पण करीत असून त्यांचे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखामध्ये सहभागी होत आहे. हया मृत्ताम्यांना चिरंशाती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे..

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

## दुखवटा ठराव

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१३दिनांक २९/१०/२००९

**ठ रा व :-**

रविवार दिनांक २५/१०/२००९ रोजी नाटयकर्मी श्री.चित्तरंजन कोल्हटकर हे वयाच्या ८६ व्या वर्षी काळाच्या पडद्याआड गेले.

कै.चित्तरंजन कोल्हटकर यांची रंगभूमीवरील कारकीर्द १९४४ मध्ये सुरु झाली. कोणतीही व्यक्तिरेखा ते अतिशय उत्कटतेने करत असत. एकच प्याला ने त्यांना अमाप लोकप्रियतादिली आणि त्यांच्यातील श्रेष्ठ अभिनेताही रसिकांसमार आणला. रंगभूमीबरोबरच मराठी चित्रपटांचा एक काळही कोल्हटकर यांच्या खलनायकी भूमिकांमुळे गाजला. हिरवा चुडा या चित्रपटातील भुमिकेसाठी त्यांना राज्य सरकारचा विशेष अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला.तसेच १९८७ च्या अखिल भारतीय नाटय संमलेनाचे अध्यक्षपदीही त्यांनी भूषविले.

कै.चित्तरंजन कोल्हटकर यांना ही स्थायी समिती श्रध्दांजली अर्पण करीत असून त्यांचे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखामध्ये सहभागी होत आहे.कैचित्तरंजन कोल्हटकर यांचे मृतात्म्यास चिरंशाती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे..

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

## दुखवटा ठराव

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक  १०१४दिनांक २९/१०/२००९

**ठ रा व :-**

ॲथलेटिक्सपट्टू व ठाणे महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. प्रल्हाद भांगले यांचे आजच सकाळी हदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. कै.प्रल्हाद भांगले हे वयाच्या १२ व्या वर्षापासून ॲथलेटिक्स खेळत असत. जिल्हा,राज्य व राष्ट्रीय पातळीवर त्याने उच्चस्तरीय ॲथलेटिकपटू म्हणुन नांव मिळवले आहे. सध्या ते ॲथलेटिक्सचे प्रशिक्षक म्हणुनही काम पहात होते. तसेच ते ठाणे महानगरपालिकेतील अतिशय गुणवान व कामामध्ये प्रामाणिक असा कर्मचारी होता. महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेमध्ये श्री.प्रल्हाद भांगले यांचा सिंहाचा वाटा होता.

कै.प्रल्हाद भांगले यांना ही स्थायी समिती श्रध्दांजली अर्पण करीत असून त्यांचे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखामध्ये सहभागी होत आहे.कै. प्रल्हाद भांगले यांचे मृतात्म्यास चिरंशाती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील | अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**<u>दुखवटा ठराव</u>**

<u>मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१५ दिनांक २९/१०/२००९</u>

**<u>ठ रा व :-</u>**

आपल्या भारत देशामध्ये ज्यांनी हरीतक्रांती घडवुन आणली ते डॉ.नॉर्मन बोरवॅक यांचे नुकतेच निधन झाले आहे.

आज आपल्या देशामध्ये निरनिराळया भातशेतीचे उत्पादन आपण घेत आहोत त्यांमध्ये डॉ.बोरवॅक यांचे योगदोन मोठे आहे. आपला देश भातशेतीमध्ये स्वयंपूर्ण झाला याचे संपूर्ण श्रेय डॉ.बोरवॅक यांनाच आहे . तसेच त्यांना नोबेल पारितोषिकही मिळालेले आहे. ७०च्या दशकामध्ये ते भारतभेटीवर आलेले होते. डॉ.नॉर्मन बोरबॅक यांचेमुळेच आपला देश, आपला महाराष्ट्र शेतीप्रधान झालेला आहे याचे संपूर्ण श्रेय आपलया देशानेच नव्हे तर जगाने त्यांनाच दिलेले आहे.

अशा हया कृषीतज्ञाच्या निधनाने संपुर्ण जग हळहळले आहे. त्यांचे निधनाने कृक्षीक्षेत्रात कधीही न भरुन येणारे नुकसान झाले आहे.

कै.नॉर्मन बोरवॅक यांना ही स्थायी समिती श्रध्दांजली अर्पण करीत असून डॉ.नॉर्मन बोरबॅक यांचे मृतात्म्यास चिरंशाती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील | अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे

(तद्‌नंतर मा.सभापती स्थायी समिती दु.१२.१५ वाजता सभा तहकुब झाल्याचे जाहीर करतात.)

**सभापती**<br>
स्थायी समिती<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**(सौ.छाया मानकर)**<br>
महापालिका सचिव,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा तहकुब झाल्याची वेळ - दु.१२.१५वा.<br>
दिनांकः-२९/१०/२००९<br>
महापालिका सचिव कार्यालय,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे.